XSEED
idiscoveri FOUNDATION FOR LIFE
UNLEASH YOUR MIND®

**Publication :** Arthniti **Region :** Mumbai

**Date :** Dec, 2010

## एक्सिड : शिक्षणातील प्रगतीचा घेतलेला ध्यास

आयडिस्कव्हरीने स्कूल ऑफ टुमॉरो या पर्वाची सांगता करत असताना आधुनिक शिक्षणासंबंधी एक्सिड या वार्षिक आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले. यामध्ये विचारवंत आणि शिक्षणतज्ज्ञांनी केलेल्या उच्च दर्जाच्या आणि उत्तेजनपर भाषणांतून शालेय शिक्षणात प्रगतीशील बदल होण्याचा मार्ग सापडू शकेल. एकाच वेळी नवी दिल्ली, मुंबई, हैदराबाद, चेन्नई येथे आयोजित करण्यात आलेल्या स्कूल ऑफ टुमॉरोच्या माध्यमातून भारतीय उपखंडात शालेय शिक्षणाबाबत वैचारिक नेतृत्व निर्माण व्हावे, यासाठी प्रयत्न करण्यात आला. इंटरनेट आणि व्हिडिओ कॉन्फरन्सिंग तंत्रज्ञानाचा वापर करून चारही शहरांमध्ये हा कार्यक्रम एकसंधपणे राबवण्यात आला.

एमआयटी, स्लोऑन स्कूल ऑफ मॅनेजमेंटचे प्रो. पीटर सेन्ज, शिकवणे आणि शिकणे यासंदर्भातील जगभरातील प्रख्यात संशोधकांपैकी एक हार्वर्ड युनिव्हर्सिटीचे प्रा. डेव्हिड पार्किन्स आणि नामवंत लेखक, प्रॉक्टर अँड गॅम्बल इंडियाचे माजी सीईओ गुरुचरण दास यांनी मार्गदर्शन केले. जे एकाच वेळी चारही केंद्रांवर प्रक्षेपित झाले. शिक्षण, कार्पोरेट आणि व्यवसाय या क्षेत्रातील ५० हून अधिक नामवंत व्यक्तींनी या मोठ्या शैक्षणिक कार्यक्रमात सहभाग दिला.

एक्सिड हा आयडिस्कव्हरीचा महत्त्वपूर्ण कार्यक्रम असून के-१२ शाळांमध्ये शिकवण्याबरोबर दर्जेदार शिक्षणासाठी सर्वसमावेशक सेवा दिल्या जातात. भारत ज्ञानाच्या बाबतीत ओसर करून महासत्तेकडे त्याला अधिक सुलभतेने नेण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे आयडिस्कव्हरीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष राजपाल यांनी सांगितले.



www.xseed.in